Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**3**

# [4002]-101

**M. A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2011**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक 1**

**(व्यावहारिक व उपयोजित मराठी-भाग 1)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** शुद्धलेखन म्हणजे काय ते सांगून शुद्धलेखनाची आवश्यकता स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उतारा लेखनविषयक नियमांनुसार दुरुस्त करून लिहा :

भारताच्या स्वातंत्र्यसंघषात त्यांनी जो क्रांतीकारक भाग घेतला, तो इतिहास कधिही विसरणार नाही. महायद्धाचे संकट जगातून नट व्हावे यासाठी त्यांनी आकाशपाताळ एक केले आणि महात्मा गांधींप्रमाणेच शांततेचा संदेश जगाला दिला. 'युद्धमुक्त जग' हे त्यांचे सर्वात चिरंतन स्मारत होय ! हे त्यांचे ध्येय सकर करण्यासाठी मानवतेन आपली परकाष्ठा करावी. सम्राट अशोक आणि शेहेनशहा अकबर यांच्या ऐतीहासिक साच्यांमधून जणू काही त्यांची रचना ईश्वराने केलेली होती. एखाद्या जहाजाचा कप्तान अकस्मात नाहिसा व्हावा आणि त्या जहाजातील लोक अनात आणि आसहाय्य व्हावे अशी या राष्ट्रातील लोकांची आज स्थीती झालेली आहे.

P.T.O.

**2.** मुद्रितशोधनाची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

खालील उतारा आपल्या उत्तरपत्रिकेत जसाच्या तसा लिहून त्याचे खुणांच्या साहाय्याने मुद्रितशोधन करा :

बालकवी हे वृतीने अतिशय निरागस होते. वाढत्या
वया बरोबर त्यांची निरागसता कधी कमी झाली नाही
त्यांच्या या वृत्तीचे त्यांच्या कवीतेवर अनेक ठिकाणी
इष्ट-अनिष्ट परिणाम झाले आहेत. परंतु त्यांच्या बालगीतांवर.
मात्र त्याचा अतिशय उत्कट परीणाम दिसून येतो.
बालकवींच्या वृत्तीबद्दल लक्ष्मिबाई टिळक म्हणतात ठोमरे बालकवी
होता, पण कवीपेक्षा तो बाल अधिक होता. या बालवृत्तीमुळेच
त्यांच्या बालकवितेत नाट्य निर्माण झाले आहे. बालकवींच्या
कवितेतील इतर गुण या कवितात आढळतात. परंतु त्याबरोबर
मुलातमुल होऊन रमणाऱ्या त्यांच्या स्वभावाची प्रचिती त्यात येते.

**3.** साहित्य संस्थांकडून आयोजित केल्या जाणाऱ्या विविध साहित्यसंमेलनाचे स्वरूप कसे असते ते थोडक्यात सांगा.

**किंवा**

वाङ्मयीन नियतकालिकांचे वाङ्मयीन अभिवृद्धीतील योगदान स्पष्ट करा.

**4.** मुलाखतीचे विविध प्रकार सांगून मुलाखतीची पूर्वतयारी कशी कराल ते लिहा.

**किंवा**

महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनासाठी सुप्रसिद्ध साहित्यिक मा. आनंद यादव यांना निमंत्रित करावयाचे आहे. त्यासाठी त्यांना उद्देशून निमंत्रणपत्र तयार करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(*i*) प्रशासनिक परिभाषा

(*ii*) ग्रंथवितरण

(*iii*) अर्जाचे प्रकार

(*iv*) दिवाळी अंकांचे योगदान.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

# [4002]-102

## M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2011

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक-2

### अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (1818 ते 1920)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. अव्वल इंग्रजी कालखंडातील सामाजिक व सांस्कृतिक प्रबोधनाचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

अव्वल इंग्रजी कालखंडातील वाङ्मयाचे स्वरूप विशद करा.

2. लोकहितवादींच्या शतपत्रातील प्रबोधनपर विचारांचा परामर्श घ्या.

**किंवा**

गो. ब. देवल यांच्या नाट्यलेखनाचा सविस्तर परिचय करून द्या.

3. 1850 ते 1874 या काळातील सामाजिक, ऐतिहासिक अद्‌भुतरम्य कादंबऱ्यांचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

हरिभाऊ आपटे यांच्या कथालेखनाची वैशिष्ट्ये सांगा.

**4.** 1874 ते 1920 या काळातील मराठी कवितेची वाटचाल स्पष्ट करा.

**किंवा**

1874 ते 1920 या काळातील निबंध वाङ्मयाची वाटचाल स्पष्ट करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर

(2) म. फुले यांचे 'तृतीय रत्न' नाटक

(3) यमुनापर्यटन

(4) मासिक मनोरंजन.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

# [4002]-103

**M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2011**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यास पत्रिका क्रमांक-3**

**भाषाविज्ञान : वर्णनात्मक**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** भाषा म्हणजे काय ते सांगून भाषाभ्यास पद्धतींचा परिचय करून द्या.

**किंवा**

उच्चार व लेखन यातील भेद स्पष्ट करा.

**2.** भाषाविज्ञानाच्या अभ्यासास विविध सामाजिक शास्त्रांचा अभ्यास कसा उपकारक ठरतो, ते सविस्तर लिहा.

**किंवा**

भाषाशास्त्र आणि बोलीभूगोल यांतील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**3.** स्वनांचा विनियोग म्हणजे काय ते सांगून विनियोगांचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

स्वन-स्वनिम-स्वनांतर या संकल्पनांचे परस्परसंबंध स्पष्ट करा.

**4.** रूपिमांचे प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

रूपबंध आणि वाक्य यांतील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) तुलनात्मक भाषाभ्यास पद्धती

(2) अर्थक्षेत्र संकल्पना

(3) खंडाधिष्ठित स्वनिम

(4) सांकल्पनिक अर्थ।

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**8+2**

# [4002]-104

## M.A. (Part I) (First Semester) EXAMINATION, 2011

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक : 4 (ऐच्छिक)

### (2008 PATTERN)

**विशेष सूचना :—**खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

(1) ग्रामीण साहित्य।

**किंवा**

(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818).

**किंवा**

(3) तौलनिक साहित्याभ्यास.

**किंवा**

(4) वाङ्मयेतिहासलेखनविधा.

**किंवा**

(5) अलंकार व छंद.

### (1) ग्रामीण साहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ग्रामीण साहित्यनिर्मितीमागील सामाजिक प्रेरणांचा उहापोह करा.

**किंवा**

ग्रामीण साहित्यप्रवाहाचे स्वरूप स्पष्ट करा.

**2.** ग्रामीण साहित्यातून बदलती कुटुंब व जातव्यवस्था यांचे चित्रण कसे घडते ते सोदाहरण लिहा.

**किंवा**

आशय, विषय आणि अभिव्यक्ती या बाबतीत ग्रामीण साहित्य कसे वेगळे ठरते ते स्पष्ट करा.

**3.** मराठी ग्रामीण कादंबरीलेखनाची वैशिष्ट्ये सांगा.

**किंवा**

स्वतंत्र्योत्तर कालखंडातील ग्रामीण कवितांचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

**4.** आनंद यादव व रा.रं. बोराडे यांच्या ग्रामीण कथा लेखनाचा परिचय करून द्या.

**किंवा**

आधुनिक ग्रामीण साहित्य चळवळीने ग्रामीण साहित्यात कोणते परिवर्तन घडवून आणले ते लिहा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) प्रादेशिक साहित्य

(2) गावगाडा—त्रि.ना. आत्रे

(3) ग्रामीण कथाकार भास्कर चंदनशिव

(4) ग्रामीण साहित्याची भाषा.

# [4002]-104

**(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ''साहित्य हे संस्कृतीचे अपत्य असते.'' विधानाची चर्चा करा.

**किंवा**

साहित्याच्या सांस्कृतिक अभ्यासाचे स्वरूप स्पष्ट करा.

**2.** मध्ययुगीन मराठी साहित्यामागील पंथीय प्रेरणांचा मागोवा घ्या.

**किंवा**

मध्ययुगीन मराठी साहित्यातील विषयवैविध्याची सांगोपांग चर्चा करा.

**3.** बहामनीकालीन मराठी वाङ्मयाचा परामर्श घ्या.

**किंवा**

मध्ययुगीन मराठीतील आख्यानकाव्यांचा परिचय करून द्या.

**4.** साहित्यप्रसाराच्या मध्ययुगीन माध्यमांचा परिचय करून द्या.

**किंवा**

लोकसाहित्य, लोकसंस्कृती व मध्ययुगीन मराठी वाङ्मय यांच्यातील अनुबंध स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) वारकरी कीर्तन

(2) भारूड

(3) वारकऱ्यांचा आचारधर्म

(4) पोवाडा.

# [4002]-104

## (3) तौलनिक साहित्याभ्यास

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ''तौलनिक साहित्याभ्यासामुळे वाङ्मयविषयक व संस्कृतीविषयक जाणिवा प्रगल्भ होतात.'' विधानाची चर्चा करा.

**किंवा**

तौलनिक साहित्याभ्यासातील मर्यादांचा ऊहापोह करा.

**2.** साहित्य निर्मितीच्या व अभिरुचीच्या दृष्टीने वाङ्मयीन प्रभावाच्या परिणामाचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

मराठी साहित्यावर कोणकोणत्या परकीय भाषांतील साहित्याचा प्रभाव पडला आहे, ते सविस्तर लिहा.

**3.** 'प्रभाव' व 'प्रभव' या संकल्पनांचे स्वरूप स्पष्ट करून त्यांचे उपयोजन कसे केले जाते ते लिहा.

**किंवा**

'राष्ट्रीय साहित्या'ची संकल्पना स्पष्ट करा.

**4.** काझी सलीम व मर्ढेकर यांच्या काव्यातील साम्य-भेद स्पष्ट करा.

**किंवा**

काझी सलीम व मर्ढेकर यांच्या काव्यातील प्रतिमा सृष्टीचा तुलनात्मक मागोवा घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) 'विश्वसाहित्या'ची संकल्पना

(2) 'तुलने'चे फलित

(3) काझी सलीम व मर्ढेकर यांच्या काव्यातील तत्त्वज्ञान

(4) काझी सलीम व मर्ढेकर यांच्या काव्यातील समानता.

# [4002]-104

## (4) वाङ्‌मयेतिहासलेखनविधा

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** इतिहास लेखनाची आवश्यकता विशद करा.

**किंवा**

इतिहासलेखन व वाङ्‌मयेतिहास लेखन यांच्यातील अनुबंध स्पष्ट करा.

**2.** वाङ्‌मयेतिहास म्हणजे काय ते थोडक्यात लिहा.

**किंवा**

''वाङ्‌मयाच्या अभिवृद्धीसाठी वाङ्‌मयेतिहासाचे लेखन आवश्यक असते.'' विधानाचा परामर्श घ्या.

**3.** पाश्चात्य विचारवंतांनी मांडलेल्या वाङ्‌मयेतिहासविषयक संकल्पनांचा परिचय करून द्या.

**किंवा**

भारतीय विचारवंतांनी मांडलेल्या वाङ्‌मयेतिहासविषयक संकल्पनांचा परिचय करून द्या.

**4.** वाङ्‌मयेतिहासकारा समोरील उद्दिष्टांनुसार वाङ्‌मयेतिहास लेखनाचे कोणते प्रकार पडतात ते सविस्तर लिहा.

**किंवा**

'वाङ्‌मयप्रकारानुसारी वाङ्‌मयेतिहास'चे स्वरूप स्पष्ट करून त्याच्या बलस्थानांची व मर्यादांची चर्चा करा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(1) बृहद्वाङ्मयेतिहास

(2) परभाषकांसाठी वाङ्मयेतिहासलेखन

(3) वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी

(4) वाङ्मयाचा भूगोल.

## (5) अलंकार आणि छंद

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** अलंकार म्हणजे काय ते संस्कृत पूर्वपीठिकेच्या आधारे स्पष्ट करा.

**किंवा**

काव्यातील अलंकारांचे महत्व विशद करा.

**2.** अलंकारांचे आलंकारत्व कोणकोणत्या तत्त्वांनी सिद्ध होते ते लिहा.

**किंवा**

प्राचीन छंदांचे स्वरूप व प्रकार सांगा.

**3.** काव्यगुण म्हणजे काय ते सांगून त्यांचे काव्यातील महत्व स्पष्ट करा.

**किंवा**

अलंकार आणि छंद यांचे काव्यरचनेतील कार्य स्पष्ट करा.

**4.** मराठीतील अलंकार व छंदविषयक चर्चेचा आढावा घ्या.

**किंवा**

मराठीतील ओवी आणि अभंग या पद्यप्रकारांची थोडक्यात ओळख करून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) रा.अ. काळेले यांनी सुचविलेले नवे अलंकार

(2) प्रतिमा आणि अलंकार

(3) वक्रोक्ती अलंकार

(4) मुक्त छंद.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**3**

# [4002]-201

**M. A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2011**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक 1**

**(व्यावहारिक व उपयोजित मराठी-भाग 2)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** भाषांतर म्हणजे काय ते सांगून भाषांतराचे महत्त्व, स्वरूप आणि आवश्यकता स्पष्ट करा.

**किंवा**

खाली दिलेल्या इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :

US President Mr. Barack Obama visit to India from November 6 to 9, 2010 heralded a new era of friendship, trust and co-operation between the two powerful democracies in the world—India and America. He was accompanied by his attorney wife Ms. Michelle Obama and encourage comprising, amongst high-profile business and administrative officials, multilayered security arrangements. On his first day in India, in Mumbai President Mr. Barack Obama paid homage to the victims of the 26/11 carnage as his first engagement and pledged solidarity with all of India in eradicating terrorism.

**2.** एका शेतकऱ्याला कमी खर्चात अधिक उत्पादन घेतल्यामुळे कृषि भूषक पुरस्कार मिळाला आहे, या कार्यक्रमाची दूरदर्शनासाठीची निवेदन संहिता तयार करा.

**किंवा**

खाली दिलेल्या हिंदी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :

आज हम ग्लोबलाइझेशन के बारे में बहुत चर्चा करते हैं, और सुनते भी हैं। वैश्विकता तो हमारे जीवन की प्रमुख धारा है। हमारी संस्कृति संपूर्ण विश्व हमारा परिवार मानती है। फिर भी हम क्षेत्रीयता का विचार क्यों करते हैं ?

आज के वैश्विक परिप्रेक्ष्य में, जहाँ एक विश्व-रूपी 'ग्लोबल विलेज' की परिकल्पना चरितार्थ होने जा रही है, वहाँ ऐसी क्षेत्रीयता, क्षेत्रीय अस्मिता अथवा ऐसे स्थानीय लोकचरित उत्साह का भावुक उद्वेलन कहाँ तक युक्तिसंगत है।

आज के वैश्विक दौर में अंतरक्षेत्रीय गतिरोध या गत्यात्मकता की बात अवश्य की जा सकती है, किन्तु पूरी दुनिया एक 'गाँव' जैसा बन जाने की संभाव्य स्थिति के बाद 'क्षेत्रीयतावाद' को इस राज्य में पुनर्जन्म देना क्या एक पिछड़ा हुआ या पश्चगामी कदम नहीं होगा ?

हम सोच लें, यह भूमि हमारी है। ये जनलोक हमारे ही तो हैं। यदि हम 'क्षेत्रीयता' की सोचें तो जो एक बने हैं, बिछड़ेंगे नहीं ? हमारी राष्ट्र की ताकद एकता में है, और इस एकता को क्षेत्रीयवाद से हानि पहुँचेगी। 'हम सब एक हैं' का नारा क्या शिक्षा देता है ? वैश्विक परिप्रेक्ष्य में हम सब योगदान दें।

**3.** जनसंपर्काचे महत्व विशद करून जनसंपर्क कौशल्याची भाषा सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागातील जनसंपर्क अधिकाऱ्याचे कार्य स्पष्ट करा.

**4.** जनसंपर्क व माहिती अधिकारी यांच्या कार्याचे स्वरूप सोदाहरण लिहा.

**किंवा**

आकाशवाणीवरील जनसंपर्क अधिकाऱ्यांच्या कार्याचे स्वरूप लिहा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) भाषांतर व रूपांतर

(2) सूत्रसंचालनाचे महत्त्व

(3) निवेदनाची तंत्रे

(4) जनसंपर्क कौशल्याची तंत्रे.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

# [4002]-202

## M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2011

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक 2

### अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (1920 ते 1960)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 1920 ते 1945 या कालखंडातील ऐतिहासिक आणि राष्ट्रीय काव्य व कवींच्या काव्य कर्तृत्वाचा आढावा घ्या.

**किंवा**

1920 ते 1945 या कालखंडातील कादंबरी लेखिकांच्या कांदबरी लेखनाचा आढावा घ्या.

**2.** 'मराठी रंगभूमीवर बहुविध सुधारणा घडवून आणणारा नाटककार' असे भा. वि. वरेरकरांना का म्हटले जाते ते स्पष्ट करा.

**किंवा**

काका कालेलकर व श्री. म. माटे यांच्या निबंधलेखनाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**3.** 1920 ते 1960 या कालखंडातील प्रवासवर्णनपर वाङ्मयाचा आढावा घ्या.

**किंवा**

1920 ते 1960 मधील चरित्र लेखनाचा थोडक्यात परामर्श घ्या.

**4.** 1920 ते 1960 या कालखंडातील पुस्तक परीक्षण करणाऱ्या लेखक समीक्षकांचा परामर्श घ्या.

**किंवा**

1920 ते 1960 या काळातील स्त्री आत्मचरित्रांचा परिचय करून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) नाट्यछटाकार दिवाकर

(2) विडंबनकाव्य व प्र. के. अत्रे

(3) साने गुरुजींची 'श्यामची आई'

(4) नवकथेची वैशिष्ट्ये.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

# [4002]-203

**M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2011**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 3**

**भाषाविज्ञान : वर्णनात्मक आणि सामाजिक**

**(सामाजिक भाषाविज्ञान)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** समाजभाषावैज्ञानिकांच्या मताधारे सामाजिक भाषाविज्ञानाचे स्वरूप आणि व्याप्ती स्पष्ट करा.

**किंवा**

सामाजिक भाषाविज्ञानातील संकल्पनांचे साधार विवेचन करा.

**2.** 'प्रादेशिक बोलींमधील भेदांचा अभ्यास करणारी विद्याशाखा' या दृष्टीने बोलीभूगोल ही संकल्पना स्पष्ट करा.

**किंवा**

प्रमाणभाषा आणि बोलीभाषा यातील साम्य-भेद सोदाहरण स्पष्ट करा.

**3.** समाजभाषाविज्ञानांतर्गत असणाऱ्या विविध भाषाभेदांचा मागोवा घ्या.

**किंवा**

'समाजभाषाविज्ञानाशी भाषा, आर्थिक वर्गव्यवस्था आणि जातिव्यवस्था या तीन घटकांचा परस्परसंबंध असतो.' साधार स्पष्ट करा.

P.T.O.

**4.** पिजिन आणि क्रिऑल भाषानिर्मितीची उदाहरणांसह कारणमीमांसा करा.

**किंवा**

'समाजांतर्गत निर्माण होणाऱ्या नवव्यवस्थांची स्वतंत्र आविष्कारपद्धती असते.' या विधानाची सोदाहरण चर्चा करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) भाषा आणि सांस्कृतिक व्यवस्था

(2) भाषा आणि परभाषा संपर्क

(3) स्त्रियांची व बालकांची भाषा

(4) भाषाबोली आणि समाज.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**4+2**

**[4002]-204**

**M.A. (Part I) (Second Semester) EXAMINATION, 2011**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्रमांक-4**

**(ऐच्छिक)**

**(2008 PATTERN)**

**विशेष सूचना :—** खालील पाच अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

(1) दलित साहित्य

**किंवा**

(2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (1818 ते 1960)

**किंवा**

(3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतर मीमांसा

**किंवा**

(4) वाङ्मयेतिहास लेखनविधा (भाग-2)

**किंवा**

(5) व्याकरण (ऐच्छिक)

## (1) दलित साहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. दलित साहित्याची संकल्पना स्पष्ट करून मराठी साहित्याशी असलेला त्याचा अनुबंध सांगा.

**किंवा**

"वेदना, विद्रोह आणि नकार ही तीन सूत्रे दलित साहित्याची बलस्थाने आहेत." चर्चा करा.

2. "दलित कविता ही समूहाच्या वेदनेची कविता आहे." या विधानाचा उदाहरणांसह परामर्श घ्या.

**किंवा**

"सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनातील विषमता हे दलित कवितेचे मूल आहे." सोदाहरण चर्चा करा.

3. दलित कथेची जडणघडण कशी झाली ते महत्त्वाच्या दलित कथा लेखकांच्या आधारे लिहा.

**किंवा**

"दलित साहित्याच्या प्रवाहात कविता, कथा, आत्मचरित्रे यांच्या तुलनेत दलित कादंबरी हा वाङ्मयप्रकार प्रबळ आणि प्रभावी झाला नाही." या विधानाची चर्चा करा.

4. दलित रंगभूमीचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

डॉ. शरणकुमार लिंबाळे यांनी मांडलेली दलित साहित्याच्या सौंदर्यशास्त्राची भूमिका स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) दलित साहित्याची बांधिलकी

(2) दलित साहित्याचे भवितव्य

(3) दलित साहित्याची समीक्षा

(4) दलित साहित्याचे देशीपण.

किंवा

## (2) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (1818 ते 1960)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. महाराष्ट्रीय जीवनातील स्थित्यंतरांचा तत्कालीन मराठी साहित्यावर कोणता परिणाम झाला, ते स्पष्ट करा.

**किंवा**

धार्मिक व सामाजिक सुधारणेच्या चळवळींचा व मराठी साहित्याचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

2. आधुनिक मराठी साहित्याच्या निर्मितीमागील विविध कारणांचा परामर्श घ्या.

**किंवा**

वा. म. जोशी यांच्या साहित्यातून बदलत्या स्त्रीचे दर्शन कसे घडते, ते सांगा.

3. "नवसाहित्याच्या उदयामुळे मराठीवाङ्मय समृद्ध बनले." या विधानाची सार्थकता पटवून द्या.

**किंवा**

राजकीय विचार प्रणाली, स्वातंत्र्यविषयक चळवळी व मराठी साहित्य यांचा अन्योन्य संबंध स्पष्ट करा.

4. मराठी साहित्य प्रचाराची आधुनिक साधने कोणकोणती आहेत ते स्पष्ट करा.

**किंवा**

1920 ते 1960 या कालखंडातील गाजलेल्या वाङ्मयीन वादाचा परामर्श घ्या.

5. कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(1) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे कार्य

(2) गीता रहस्य

(3) संगीत शारदा

(4) परमहंस मंडळी.

किंवा

**(3) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतर मीमांसा**

**(भाषांतर मीमांसा)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. भाषांतर ही संकल्पना विविध दृष्टीकोनातून स्पष्ट करा.

**किंवा**

भाषांतर म्हणजे काय ते सांगून भाषांतराचे विविध प्रकार व कार्य स्पष्ट करा.

2. भाषांतर, अनुवाद आणि रूपांतर यांचा परस्पर संबंध स्पष्ट करा.

**किंवा**

ललित वाङ्‌मयाच्या भाषांतराचे स्वरूप, त्याची गरज आणि मर्यादांचा विचार करा.

3. 'हवेली वेव्हरलेची' या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखांचा परिचय करून द्या.

**किंवा**

"'हवेली वेव्हरलेची' ही एक तरल प्रेमकथाही आहे." परामर्श घ्या.

4. "'तुंबाडचे खोत' ही रम्याद्‌भुत तशी उग्रभीषण कहाणी आहे." स्पष्ट करा.

**किंवा**

'द्विखंडात्मक कादंबरी म्हणून तुंबाडचे खोत' या महाकाय कादंबरीची थोडक्यात चर्चा करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) याकबसनची भाषांतर कल्पना

(2) नाटकाच्या भाषांतरविषयक समस्या

(3) 'हवेली वेव्हरले'तील रूही

(4) 'तुंबाडचे खोत' मधील स्त्रीचित्रणे.

किंवा

## (4) वाङ्‌मयेतिहास लेखनविधा (भाग-2)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. मराठी वाङ्‌मयाच्या भारतक्षेत्रीय अभ्यासाचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

'भारतीय वाङ्‌मयेतिहास वैविध्यपूर्ण आहे' या विधानाची चर्चा करा.

2. आधुनिक मराठी वाङ्‌मयेतिहास लेखनातील समस्या व अडचणी यांचा विचार करा.

**किंवा**

मध्ययुगीन वाङ्‌मयेतिहासकरांचा परिचय करून द्या.

3. मराठी वाङ्‌मयेतिहास लेखकाच्या इतिहासाचा आढावा घ्या.

**किंवा**

वि. ल. भावे, ह. श्री. शेणोलीकर आणि ल. रा. नसिराबादकर यांना वाङ्‌मयेतिहासविषयक केलेल्या कार्याचे स्थूल स्वरूप सांगा.

4. मराठीतील वाङ्‌मयेतिहासाच्या विचारांचा मागोवा घ्या.

**किंवा**

माटे आणि बेडेकर यांचा मराठी वाङ्‌मयेतिहासविषयक विचार स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) कुसुमावती देशपांडे यांचे वाङ्‌मयेतिहासविषयक कार्य

(2) माटे-बेडेकर वाद

(3) महाराष्ट्राबाहेरील मध्ययुगीन मराठी वाङ्‌मय

(4) वाङ्‌मयेतिहास लेखनातील तांत्रिक अडचणी.

किंवा

## (5) व्याकरण (ऐच्छिक)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. मराठी भाषेच्या व्याकरणाची व्युत्पत्ती व स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

'व्याकरण हा भाषेचा आत्मा असतो.' मराठी भाषेसंदर्भात विचार करा.

2. व्याकरण आणि भाषा यांच्यातील अनुबंध विशद करा.

**किंवा**

व्याकरणविषयक विविध प्रश्नांचा मराठीभाषेसंदर्भात मागोवा घ्या.

3. 'व्याकरणाचे प्रकार हे भाषेच्या अभ्यासातील महत्त्वाचे सूत्र आहे.' मराठी भाषेसंदर्भात स्पष्ट करा.

**किंवा**

वर्ण, शब्द आणि वाक्यविचार या संदर्भात मराठी व्याकरणाचा विचार करा.

4. मराठीतील व्याकरणाच्या अभ्यासकांचा परिचय करून द्या.

**किंवा**

मराठीतील व्याकरणविषयक चिंतनाचा आढावा घ्या.

5. कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(1) व्याकरणाच्या व्याख्या

(2) व्याकरणाची मूलतत्त्वे

(3) मराठी व्याकरणातील वाद

(4) अरविंद मंगरूळकरांचा व्याकरणविचार.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

# [4002]-301

**M. A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2011**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 5**

**(प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'लोकशाही'तील प्रसारमाध्यमांची भूमिका स्पष्ट करा.

**किंवा**

वृत्त संस्कृतीतील बदलांचा मागोवा घ्या.

**2.** क्रीडा पत्रकारितेसाठी आवश्यक असणाऱ्या कौशल्यांचा परामर्श घ्या.

**किंवा**

फीचर व रिपोर्टाज् लेखनातील फरक सोदाहरण लिहा.

**3.** 'सर्जनात्मक आस्वादलेखन' म्हणजे काय, ते थोडक्यात लिहा.

**किंवा**

तुम्हाला आवडलेल्या मराठी नाटकावर आस्वादात्मक लेख लिहा.

**4.** दृक्-श्राव्य माध्यमातील संहितेचे लेखन करताना कोणकोणत्या गोष्टी विचारात घ्याव्या लागतात ?

**किंवा**

दृक्-श्राव्य माध्यमासाठी 'वृत्तसार' लेखन करताना कोण-कोणत्या घटकांचा विचार प्रस्तुत ठरतो, ते लहा.

**5.** खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :

(*i*) चित्रप्रदर्शन-वृत्तांत

(*ii*) विकास पत्रकारिता

(*iii*) लेखक परिचय

(*iv*) वृत्त संपादन.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

# [4002]-302

## M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2011

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र. 6

### (साहित्य : समीक्षा आणि संशोधन)

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहे.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

1. समीक्षा ही एक प्रकारे पुनर्निर्मितीच कशी असते, ते साधार लिहा.

**किंवा**

समीक्षेची प्रयोजने उदाहरणांसह विशद करा.

2. समीक्षकाने चिकित्सा करूनही मूल्यविवेक कसा दाखवावा ते सोदाहरण मांडा.

**किंवा**

समीक्षकाजवळ कोणते तारतम्य असावे ?

3. मानसशास्त्रीय पद्धतीच्या मर्यादेतूनच आदिबंधात्मक समीक्षापद्धती कशी विकसित झाली, ते लिहा.

**किंवा**

सध्या मार्क्सवादी समीक्षापद्धतीने समीक्षा होते आहे काय ? सकारण लिहा.

4. प्रारंभकालीन (1874 ते 1920) मराठी समीक्षेची वाटचाल उधारउसनवारीतून कशी घडत गेली, ते लिहा.

**किंवा**

स्वातंत्र्योत्तर मराठी समीक्षेचे स्वरूप पूर्वीच्या तुलनेने बदलले का व कसे ते स्पष्ट करा.

5. कोणत्याही **दोहोंवर** टीपा लिहा :

(अ) समीक्षक न. चिं. केळकर **किंवा** गंगाधर गाडगीळ

(आ) लेखकाला उपकारक ठरणारी समीक्षा

(इ) निकषाचे तारतम्य

(ई) ऐतिहासिक समीक्षा पद्धतीचे स्वरूप.

Total No. of Questions—**5+5**] [Total No. of Printed Pages—**4**

# [4002]-303

**M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2011**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यास पत्रिका क्रमांक-7**

**(विशेष लेखकाचा अभ्यास) (प्राचीन/अर्वाचीन)**

**(प्राचीन-संत तुकाराम)**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** संत तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाचे कोणकोणते पैलू त्यांच्या अभंगातून दिसून येतात, ते स्पष्ट करा.

**किंवा**

संत तुकारामांच्या जीवनकार्याचा परिचय करून द्या.

**2.** संत तुकारामांच्या अध्यात्मिक वाटचालीचा त्यांच्या अभंगांच्या आधारे परामर्श घ्या.

**किंवा**

'संत तुकारामांची साधकावस्था' त्यांच्या अभंग रचनेतून कशी प्रतीत आहे.

**3.** संत तुकारामांच्या उपदेशपर अभंगाचा साधार परामर्श घ्या.

P.T.O.

**किंवा**

संत तुकारामांनी आलेल्या अनुभवाचे रूपांतर तत्वज्ञानात कसे केले ते सोदाहरण स्पष्ट करा.

**4.** ‘संत तुकारामांच्या अभंगवाणीतून व्यक्त झालेली धर्मसुधारणा’—सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

‘तुका झालासे कळस’ या विधानाचे मर्म साधार स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) संत तुकारामांचे आत्मपर अभंग

(ब) संत तुकारामांचे कवित्व

(क) संत तुकारामांचे विठ्ठलभक्तीपर अभंग

(ड) संत तुकारामांचे मराठी ‘अभंगाला’ योगदान।

# [4002]-303

## (अर्वाचीन—डॉ. द. ता. भोसले)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** द. ता. भोसले यांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व विशद करा.

**किंवा**

मराठीतील प्रमुख ग्रामीण लेखकांपेक्षा द. ता. भोसले यांचे वेगळेपण स्पष्ट करा.

**2.** ग्रामीणतेचे निकष सांगून त्या आधारे द. ता. भोसले यांच्या महत्त्वाच्या कथासंग्रहांचे परीक्षण करा.

**किंवा**

'ग्रामीणता हा चांगल्या साहित्याचा एकमेव निकष होऊ शकतो काय ?' द. ता. भोसले यांच्या साहित्याच्या आधारे स्पष्ट करा.

**3.** 'मी आणि माझा बाप' या कादंबरीचे तुमच्या दृष्टिकोनातून परीक्षण करा.

**किंवा**

'इथे फुलांना मरण जन्मता' या कादंबरीची निर्मिती प्रक्रिया उलगडून दाखवा.

**4.** 'बालमुठीतील दिवस' व 'आठवणीतील दिवस' या दोन संग्रहातील लालित्य कशात दडले आहे ? साधार स्पष्ट करा.

**किंवा**

'ललितगद्य लेखन हा लेखकाचाच आत्माविष्कार असतो' 'परिघावरची माणसं' च्या आधारे लिहा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) द. ता. भोसले यांचे 'लेखकपण'.

(ब) द. ता. भोसले यांच्या साहित्यातील ग्रामीण परिसराचे विशेष.

(क) द. ता. भोसले यांच्या भाषेचे विशेष.

(ड) द. ता. भोसले यांच्या 'पाळत' मधील पात्रे.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**8+2**

# [4002]-304

## M.A. (Part II) (Third Semester) EXAMINATION, 2011

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक : 8 (ऐच्छिक)

### (2008 PATTERN)

(1) सौंदर्यशास्त्र.

(2) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य.

(3) लेखनविधा व निबंधलेखन.

(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास.

(5) साहित्य : सर्जन व उपयोजन.

**विशेष सूचना :—**वरील प्रश्नपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

### (1) सौंदर्यशास्त्र

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** निसर्गातील सौंदर्य व निसर्गाबाहेरील सौंदर्य यांची तुलना करा.

**किंवा**

नव्या शोधांच्या संदर्भात सौंदर्यशास्त्राचे महत्व विशद करा.

**2.** द्विध्रुवात्मकतेच्या अनुषंगाने सौंदर्यवाचक विधानाचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

सौंदर्यविधान आणि मूल्यविधान यांच्यातील तौलनिक संबंधांची चर्चा करा.

**3.** आविष्कारवादी सौंदर्यसिद्धान्ताचा परिचय करून द्या.

**किंवा**

सह-अनुभूतीच्या सिद्धान्ताचा परामर्श घ्या.

**4.** सौंदर्यानुभव व्यावहारिक अनुभवापेक्षा वेगळा कसा व कोणत्या बाबतीत, ते लिहा.

**किंवा**

सौंदर्यानुभवातील तटस्थतेचे स्थान स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) सौंदर्यशास्त्र आणि मनोविज्ञान

(आ) सौंदर्यविधानाची अनन्यता.

(इ) सुखवादाचा सौंदर्य सिद्धान्त.

(ई) सौंदर्यानुभवातील ज्ञानशक्तीचे मुक्तमेलन.

# [4002]-304

## (2) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** 'लोक' व 'साहित्य' या पदांचे लोकसाहित्याच्या संदर्भात स्पष्टीकरण करा.

**किंवा**

लोकसाहित्याचा सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय जीवनाशी असलेला संबंध स्पष्ट करा.

**2.** लोकसाहित्याचे जागतिक अभ्यासक्षेत्र विशद करा.

**किंवा**

लोकसाहित्याच्या अध्ययनाची आवश्यकता का आहे ? साहित्य, शास्त्र या संदर्भात चर्चा करा.

**3.** लोकसाहित्य आणि ग्रांथिक साहित्य यांच्यातील संबंधांचे विश्लेषण करा.

**किंवा**

'संतसाहित्य आधुनिक साहित्य यांनाही लोकसाहित्याने सामुग्री पुरविली आहे.' कशी ते सोदाहरण लिहा.

**4.** लोकसाहित्याच्या संकलनाच्या विविध पद्धतींचा परिचय करून द्या.

**किंवा**

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) म्हणी, उखाणे—यातील लोकतत्त्व

(आ) लोकसाहित्याच्या अभ्यासकाने पाळावयाची पथ्ये

(इ) लोकसाहित्य इतिहास आणि पुरातत्त्व—यातील अनुबंध

(ई) लोकसाहित्य आणि महाकाव्य.

# [4002]-304

## (3) लेखनविधा व निबंधलेखन

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** समाजव्यवहारातील संवादाचे महत्व विशद करा.

**किंवा**

'संवाद' ही संकल्पना स्पष्ट करून संवाद-प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट करा.

**2.** संवादप्रक्रियेतील प्रमुख घटक कोणते ? त्यांचे कार्य कसे चालते ? अडथळे का व कशामुळे येतात—ते लिहा.

**किंवा**

संवादविषयक सिद्धांताचा परिचय करून द्या.

**3.** संवादप्रक्रियेत अर्थनिर्णयन कसे केले जाते, ते सोदाहरण लिहा.

**किंवा**

अर्थनिश्चितीमागील निकषांचा सोदाहरण परामर्श घ्या.

**4.** भाषेच्या प्रगत कौशल्यांची सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

समकालीन जीवनातील तंत्रसाधनांचा, संवादसुविधांचा संवादक्रियेवर झालेला परिणाम उदाहरणांसह लिहा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) विज्ञान तंत्रज्ञानाच्या प्रसारणात मराठीची संवादक्षमता

(आ) संवादक्षमता आणि भाषिक परिवर्तन

(इ) भाषेची प्राथमिक कौशल्ये

(ई) भाषा : चिन्ह व्यवस्था.

# [4002]-304

**(4) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** ''कृतिशील विचारप्रवर्तन हे मराठीतील वैचारिक साहित्याचे प्रधान लक्षण आहे.'' या विधानाची सोदाहरण चर्चा करा.

**किंवा**

विचार म्हणजे काय ? व्यक्ती, समाज व राष्ट्र यांच्या उत्थानात मराठीतील वैचारिक साहित्याचे योगदान स्पष्ट करा.

**2.** ''मराठीतील वैचारिक साहित्याच्या विकासात वर्तमानपत्रांनी मोठा सहभाग नोंदविला आहे.'' या विधानाची चिकित्सा करा.

**किंवा**

न्या. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, विठ्ठलरामजी शिंदे यांच्या वैचारिक साहित्याची वैशिष्ट्ये लिहा.

**3.** म.फुले, मुकुंदराव पाटील आणि ताराबाई शिंदे यांच्या साहित्यातील विचारसूत्रांचा परामर्श घ्या.

**किंवा**

आचार्य जावडेकर व अन्य गांधीवादी विचारवंतांच्या विचारांचा परामर्श घ्या.

**4.** पु.ग. सहस्रबुद्धे, दि.के. बेडेकर व के.रं. शिरवाडकर यांच्या लेखनातील वैचारिकता स्पष्ट करा.

**किंवा**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लालजी पेंडसे व गं.बा. सरदार यांच्या पुरोगामी विचारांचा परिचय करून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) श्री.म. माटे यांच्या निबंधांतील सामाजिक विचार

(आ) शि.म. परांजपे यांच्या निबंधातील वक्रोक्ति कुशलता

(इ) साहित्याचा सामाजिक दृष्टीने केल्या जाणाऱ्या अभ्यासाचे निकष

(ई) निबंधकार बाळशास्त्री जांभेकर.

# [4002]-304

**(5) साहित्य : सर्जन व उपयोजन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** भरताचे नाट्यनिर्मितीसंबंधीचे विवेचन सर्व साहित्यप्रकाराच्या निर्मितीस लागू पडते काय ? कसे, ते लिहा.

**किंवा**

रीतिविचार आणि शैलीविचार यांची तौलनिक चिकित्सा करा.

**2.** 'सर्जनशीलतेचे महत्व सर्व साहित्यप्रकारांमध्ये असते'—कसे ते सोदाहरण लिहा.

**किंवा**

कादंबरी या साहित्यप्रकाराची जीवन-समांतरता विशद करा.

**3.** नाटकाची संहिता ते प्रयोग व प्रयोग ते संहिता—या वाटचालीचा परामर्श घ्या.

**किंवा**

'गोष्ट', 'लघुकथा', 'दीर्घकथा', 'कादंबरीका' यांचे स्वरूप विशेष नोंदवा.

**4.** ''सौंदर्य, आनंद आणि नवनिर्मिती ही साहित्य सर्जनाची ओळख असते.'' या विधानाची उचितता स्पष्ट करा.

**किंवा**

विशिष्ट साहित्यप्रकाराची निर्मिती ही स्वैर निर्मितीपेक्षा अधिक कष्टदायक कशी असते, ते लिहा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) साहित्यनिर्मिती संबंधातील ॲरिस्टाटलची मते

(आ) साहित्याच्या भाषेचे वेगळेपण

(इ) कलांतर आणि सर्जन

(ई) साहित्यिकाचे परंपराज्ञान.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

# [4002]-401

## M. A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2011

## MARATHI (मराठी)

## अभ्यासपत्रिका क्रमांक 5

## (प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार)

## (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** वृत्तसंकलनाची प्रक्रिया 'निसर्ग व पर्यावरण' या विषयाच्या संदर्भात उलगडून दाखवा.

**किंवा**

वृत्तसंकलनाची संकल्पना स्पष्ट करून नाट्याच्या संदर्भात वृत्तसंकलनाची चर्चा करा.

**2.** 'माध्यमानुसार जाहिरातीचे स्वरूप बदलते', कसे ते सोदाहरण सांगा.

**किंवा**

मुद्रित, श्राव्य आणि दृकश्राव्य माध्यमासाठी 'वाङ्मयीन नियतकालिकाची' जाहिरात तयार करा.

**3.** चित्रपट माध्यमासाठी करावयाच्या पटकथालेखनाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये याविषयी सविस्तर लिहा.

**किंवा**

दृक-श्राव्य माध्यमासाठी 'हुंडाबळी' या विषयावर पटकथा लेखन करा.

**4.** 'कादंबरीपेक्षा पटकथेमध्ये दृश्यात्मकतेवर भर असतो.' सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

'नाटक' या साहित्य प्रकारासाठी लेखन करताना कोणती काळजी घ्यावी, ते सांगा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) लोकवाङ्‌मयाचे वृत्तसंकलन

(ब) जाहिरात लेखनाची संकल्पना

(क) पटकथा लेखनाचे तंत्र

(ड) कथेचे पटकथेत रूपांतर.

Total No. of Questions—**5**] [Total No. of Printed Pages—**2**

# [4002]-402

## M.A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2011

## MARATHI (मराठी)

**अभ्यासपत्रिका क्रमांक 6**

**साहित्य : समीक्षा व संशोधन**

**(2008 PATTERN)**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्य संशोधनाची संकल्पना स्पष्ट करून संशोधनाच्या विविध प्रेरणा सांगा.

**किंवा**

संशोधनाच्या विविध व्याख्या सांगून संशोधनाची विविध प्रयोजने सांगा.

**2.** वाङ्मयीन संशोधनाची विविध अभ्यासक्षेत्रे सांगून, **एका** लेखकाचा अभ्यास करताना कोणकोणत्या घटकांचा विचार अभिप्रेत आहे, ते सांगा.

**किंवा**

लोकसाहित्यविषयक संशोधनाचे स्वरूप साधार स्पष्ट करा.

**3.** साहित्य आणि इतिहास यांच्या परस्परसंबंधाचे महत्त्व विशद करा.

**किंवा**

"संशोधनाद्वारे सामाजिक व सांस्कृतिक अनुबंधाचा शोध घेता येतो." स्पष्ट करा.

P.T.O.

**4.** भाषाविषयक संशोधनाचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

महानुभाव वाङ्मयाच्या संशोधनाचा आढावा घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) संशोधनाची साधने—नियतकालिके

(ब) तौलनिक साहित्याभ्यास

(क) साहित्य आणि मानसशास्त्र

(ड) मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचे संशोधन.

Total No. of Questions—**5+5**] [Total No. of Printed Pages—**4**

# [4002]-403

## M.A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2011

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्र.-7

### विशेष लेखकाचा अभ्यास (प्राचीन/अर्वाचीन)

### प्राचीन—संत तुकाराम

### (2008 PATTERN)

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** संत तुकारामांच्या गाथेतील अनुभव विश्वाचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

''संत तुकारामांची अभंगवाणी उत्त्कट भावकविता आहे.'' साधार चर्चा करा.

**2.** संत तुकारामांच्या काव्यसृष्टीचा वाङ्मयीन परामर्श घ्या.

**किंवा**

संत तुकारामांच्या कवित्त्वाची विविध गुणवैशिष्ट्ये सोदाहरण सांगा.

**3.** ''संत तुकारामांची अभंगवाणी मराठी संस्कृतीचे अविभाज्य अंग आहे.'' चर्चा करा.

**किंवा**

संत तुकारामांच्या अभंगवाणीतील 'लोकतत्त्वे व लोकमाध्यमे' सांगा.

**4.** संत तुकारामांच्या अभंगातील विद्रोहाचे स्वरूप सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

समकालीन संतांपेक्षा तुकारामांच्या अभंगवाणीचे वेगळेपण व वैशिष्ट्ये सांगा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) संत तुकारामांची अभंगगाथा—छंदाची निवड

(ब) संत तुकारामांचे 'आत्मपर अभंग'

(क) संत तुकारामांची ईश्वरविषयक कल्पना

(ड) संत तुकारामांच्या अभंगातील प्रतिमासृष्टी.

# [4002]-403

## अर्वाचीन—द. ता. भोसले

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** द. ता. भोसले यांच्या ग्रामीण बोलीच्या शब्दकोशाची उपयुक्तता विशद करा.

**किंवा**

'चावडीवरचा दिवा' या ललित लेख संग्रहाचा वाङ्मयीन परामर्श घ्या.

**2.** संत गाडगेबाबांनी जोपासलेल्या मूल्यांचे दर्शन 'लोकोत्तर गाडगेबाबा : जीवन व कार्य' या ग्रंथातून कसे घडते ते सविस्तर लिहा.

**किंवा**

लोकसंस्कृतीच्या जडणघडणीमध्ये कृषीजीवनाचा व निसर्गाचा फार मोठा वाटा आहे, असे द. ता. भोसले का म्हणतात ? स्पष्ट करा.

**3.** महाराष्ट्राच्या ग्रामीण संस्कृतीचे योगदान 'संस्कृतीच्या पाऊलखुणा' या पुस्तकातून कशारितीने उलगडून दाखवले आहे, ते सांगा.

**किंवा**

गतकाळातील ग्रामजीवन व ग्रामसंस्कृती 'चावडीवरचा दिवा' या लेखसंग्रहातून साकार झालेली आहे. कसे ते सोदाहरण सांगा.

**4.** ‘ग्रामीण साहित्य : एक चिंतन’ या ग्रंथाच्या आधारे द. ता. भोसले यांनी केलेल्या चिंतनाचा परामर्श घ्या.

**किंवा**

‘ग्रामीण साहित्य : एक चिंतन’ या ग्रंथाच्या आधारे द. ता. भोसले यांच्या ग्रामीण साहित्याविषयीच्या भूमिकेचा परामर्श घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) ‘चावडीवरचा दिवा’ मधील ‘बैलपोळा’.

(ब) ‘संस्कृतीच्या पाऊलखुणा’ मधील ‘बहुरूपी’.

(क) नागपूजा व लोकपरंपरा.

(ड) संत गाडगेबाबांनी केलेले समाजप्रबोधन.

Total No. of Questions—**5+5+5+5+5**] [Total No. of Printed Pages—**8+2**

# [4002]-404

## M.A. (Part II) (Fourth Semester) EXAMINATION, 2011

## MARATHI (मराठी)

### अभ्यासपत्रिका क्रमांक 8 (ऐच्छिक)

### (2008 PATTERN)

**विशेष सूचना :** खालील **पाच** अभ्यासपत्रिकांपैकी कोणतीही **एक** प्रश्नपत्रिका सोडवावी.

(1) लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य

**किंवा**

(2) सौंदर्यशास्त्र

**किंवा**

(3) निबंधलेखन

**किंवा**

(4) साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

**किंवा**

(5) साहित्य : सर्जन व उपयोजन

### (1) लोकसाहित्याची मूलतत्वे आणि मराठी लोकसाहित्य

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** मराठी लोकगीतांचे स्वरूप व विविध प्रकार यांचे विवेचन करा.

**किंवा**

मराठी लोकसाहित्यातील स्त्रीगीतांचा साधार परामर्श घ्या.

P.T.O.

**2.** मराठी लोककथांची वैशिष्ट्ये सोदाहरण लिहा.

**किंवा**

मराठी लोककथेच्या विविध प्रकारांचा साधार परामर्श घ्या.

**3.** लोकनाट्य म्हणजे काय ? ते सांगून त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**किंवा**

''तमाशाचे पारंपरिक रूप बदलण्याचे मुख्य कारण लोकांच्या अभिरुचीत आहे.'' कसे ते सांगा.

**4.** लोकसाहित्यातील लोककलाप्रकारांचा साधार परामर्श घ्या.

**किंवा**

लोककला आविष्कार आणि आधुनिक साहित्य यांचा अनुबंध स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) लोकसाहित्याच्या अभ्यासक—सरोजिनी बाबर.

(ब) लोकसाहित्याच्या अभ्यासास सहाय्य करणाऱ्या संस्था.

(क) लोकगीते व संतकवींची कविता.

(ड) लोककथांच्या उत्पत्तीसंबंधी विविध विचार।

# [4002]-404

## (2) सौंदर्यशास्त्र

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :—** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** इतर भावनांहून सौंदर्यभावना कोणत्या बाबतीत भिन्न असते ते स्पष्ट करा.

**किंवा**

सौंदर्यभावनेचे स्वरूप व कार्य विशद करा.

**2.** 'रूप' म्हणजे काय ते सांगून रूपविषयक विविध निकषांचा परिचय करून द्या.

**किंवा**

सेंद्रिय एकात्मतेच्या सिद्धांताचे स्वरूप स्पष्ट करा.

**3.** कलेच्या परिणामांचे स्पष्टीकरण करणाऱ्या सौंदर्यशास्त्रातील सिद्धांताचा परिचय करून द्या.

**किंवा**

साहित्यकृतीच्या आस्वादातील 'भावनात्मक समधातता' म्हणजे काय ते सोदाहरण विशद करा.

**4.** ''सौंदर्यशास्त्राच्या अभ्यासामुळे आपला समीक्षाविषयक विचार अधिक सुव्यवस्थित होण्यास मदत होते.'' या विधानाची मीमांसा करा.

**किंवा**

सौंदर्यशास्त्र व साहित्यविचार यातील संबंध स्पष्ट करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) सौंदर्यभावना व जीवशास्त्रीय भावना;

(ब) विरेचन सिद्धांत;

(क) परिणामकारक संदेशन;

(ड) सौंदर्यशास्त्राभ्यास आणि समीक्षाक्षमता.

# [4002]-404

## (३) निबंधलेखन

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :**— (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** जीवनव्यवहारातील क्षेत्रानुसार भाषेचे स्वरूप कसे बदलत जाते ते सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

भाषा आणि जीवन यांतील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**2.** जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे मराठी भाषेपुढे कोणती आव्हाने निर्माण झालेली आहेत, याची मीमांसा करा.

**किंवा**

आजच्या जीवनव्यवहारातील मराठी भाषेच्या स्थानाची चर्चा करा.

**3.** आधुनिक प्रसारमाध्यमातील मराठी भाषेचे स्वरूप विशद करा.

**किंवा**

आधुनिक प्रसारमाध्यमासाठी लेखन करतांना कोणकोणत्या घटकांची जाणीव असावी लागते, ते सांगा.

**4.** संपादनासाठी आवश्यक असलेल्या कौशल्यांचा परिचय करून द्या.

**किंवा**

निबंध म्हणजे काय ते सांगून त्याच्या अभिव्यक्ती विशेषांचा परिचय करून द्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) कार्यालयीन मराठी;

(ब) जनसंपर्कासाठीची भाषिक कौशल्ये;

(क) जाहिरातींतील मराठीचे स्वरूप;

(ड) दूरदर्शन माध्यमातील मराठीचे स्वरूप.

# [4002]-404

## (4) साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्याच्या सामाजिक अभ्यास म्हणजे काय ते सांगून त्याची आवश्यकता स्पष्ट करा.

**किंवा**

साहित्याच्या सामाजिक अभ्यासाचे हेतू स्पष्ट करा.

**2.** लेखकाची जीवनदृष्टी आणि सामाजिक पर्यावरण यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

**किंवा**

आर्थिक व सामाजिक घटकांच्या लेखकावर पडणाऱ्या प्रभावाची चर्चा करा.

**3.** वाङ्मयीन अभिरुचीच्या जडणघडणीतील सामाजिक घटकांचे महत्व विशद करा.

**किंवा**

कालतत्त्व हा घटक साहित्यनिर्मितीला कसा प्रभावित करतो, त्याची चर्चा करा.

**4.** कलारूपांची स्थलकालसंस्कृती सापेक्षता स्पष्ट करा.

**किंवा**

वाचक प्रतिसाद सिद्धांतामुळे साहित्यकृतीचे आकलन बदलते का याची साधार चर्चा करा.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) नव्या वाङ्मयप्रकारांच्या निर्मितीची कारणे

(ब) वाङ्मयीन शैली व तंत्रविचाराची सामाजिक पार्श्वभूमी

(क) सामाजिक चळवळी व मराठी साहित्य

(ड) कलामूल्यांची जीवनसापेक्षता.

# [4002]-404

**(5) साहित्य : सर्जन व उपयोजन**

**वेळ : तीन तास** **एकूण गुण : 80**

**सूचना :** (*i*) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

(*ii*) **सर्व** प्रश्नांना समान गुण आहेत.

**1.** साहित्यनिर्मितीच्या संदर्भात विश्वात्मकता आणि विशिष्टता या **दोन** घटकांचा परिचय करून द्या.

**किंवा**

युगभानामुळे साहित्यनिर्मितीला नवी दिशा कशी प्राप्त होते ते विशद करा.

**2.** सामाजिक पर्यावरणाचा निर्मितीप्रक्रियेवर होणारा परिणाम स्पष्ट करा.

**किंवा**

निर्मितीप्रक्रियेतील कल्पनाशक्तीचे महत्व स्पष्ट करा.

**3.** निर्मितीप्रक्रियेतील समस्या आणि रसविघ्ने यांचा संबंध स्पष्ट करा.

**किंवा**

सामाजिक परिस्थीती आणि प्रयोगशीलता यातील संबंध स्पष्ट करा.

**4.** भाषा या माध्यमाचे साहित्यनिर्मिती संदर्भातील महत्व स्पष्ट करा.

**किंवा**

पाश्चात्य मीमांसकांच्या कल्पनाशक्तीविषयक विचारांचा परामर्श घ्या.

**5.** कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा :

(अ) साहित्यनिर्मितीच्या संदर्भातील लेखकनिष्ठ प्रयोजन

(ब) मनोविश्लेषण आणि साहित्यनिर्मितीप्रक्रिया

(क) साहित्यनिर्मितीप्रक्रिया व कलावंताची जीवनदृष्टी.

(ड) साहित्यनिर्मितीत स्फूर्तीचे महत्व.